# महाराष्ट्रातील चळवळीच्या इतिहास अनूषंगाने "हैद्राबाद मूक्तीसंग्रमात मराठवाड्याचे योगदान

**शिवाजी काशीनाथ गायकवाड,** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद. shivaji.gaikwad32@gmail.com

---

**प्रस्ताविकः**

आंदोलनासाठी व्यथा महत्त्वाची असते. जो पर्यंत व्यक्तीपरत्वे स्वाभिमान जागृत होत नाही तो पर्यंत अस्मिता उभी राहत नाही. मग ती आपल्या परीसराबद्दल असो, तेथील भाषेबद्दल असो, गावखेडे, आपले माणसे, संस्कृती वा ज्यांनी आपल्या हितकरी समाज समूदायाबद्दल दिलेले योगदान त्यातून झालेला विकास अथवा आपलेपणा यातून खऱ्या अर्थाने कृतज्ञता अर्पण करणे कारण त्या त्या काळात त्या त्या व्यक्ती समाज, संस्कृतीतून आदर्श नीतीतत्वे अथवा आदर्श मिळत असतात. त्या पाठोपाठ समाज आपले मार्गक्रमण करत असतो. आपल्या हक्क कर्तव्यावर गदा येत असेल तर समाज त्या विरुद्ध एकत्र येवून त्या त्या विचाराविरुद्ध आवाज उठवण्यासाठी एकत्रीत येतो. असे समाजशास्त्रीय विचार आहे. समाजातील समाज समूहाच्या आंतरक्रीया, आंतर संबध, परस्पर संबध समाजातील प्रथा, परंपरा यातून संस्कृतीकरणाला सूरुवात होतांना दिसते. असेच प्रकारे आपला देश, राष्ट्र, भाषा, संस्कृती, भूमीपूत्र आदि संकल्पना व्यक्तीच्या व्यक्तीमत्वावर प्रभाव पाडत असतात. स्वातंत्र्य प्राप्तनंतर सामाजिक सूधारणांची प्रक्रीयां मंद झालेली दिसून येते.सत्तास्पर्धेच्या राजकारणाने जातियतेसारख्या समाजविघातक गोष्टींना अधिक प्रोत्साहन दिलेले आहेत.त्यामूळे शैक्षणिक कार्याला आद्य कर्तव्य मानत समर्पण भावना ठेवून कार्य करणारे लोक कमी प्रमाणात दिसतात.

मराठवाड्यातही कर्मवीर भाऊराव पाटलांसारखा शिक्षण वेत्ता अथवा डॉ. पंजाबराव देशमूख यांच्या सारखे शिक्षणाची दूरदृष्टी असणारे नेते मिळू शकले नाही. निजाम सरकारच्या सातशे वर्षाच्या कार्यकाळात अडकलेल्या मराठवाड्याचा सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, सहकाराला अपेक्षित विकास होवू शकला नाही. स्वामी रामानंद तिर्थ यांचा अपवाद सोडता त्यांनी समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत राष्ट्रीय भावना पोहचवण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथे शाळा सूरु करत शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खूली केलेली होती असे दिसून येते. परंतु हैद्राबाद संस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी शिक्षण प्रसाराचे कार्य व प्रयत्न अत्यअल्प होता. महाराष्ट्रात मराठवाडा सामिल झाल्यानंतर शिक्षण झपाट्याने वाढत गेल्याचे दिसून येते.ते आजतागायत वेगाने वाढतच आहे, हे दिसून येईल.

**गृहीतकः**

हैद्राबाद मूक्ती लढ्याचे यशापयश हे हैद्राबाद संस्थानातिल जातिय संघर्ष यावर अवलंबून होते.राज्यातील सामान्य जणांवर अन्याय अत्याचार वाढला होता. भारतीय स्वातंत्र्यात अस्मिता ,लोकशाही विचारांना प्राधान्य होते. मराठवाड्यातिल लोक, नेते, महीला यांचा या लढ्यात सहभाग होता, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विचारांची दूरदृष्टी लढ्याला होती. आदि उद्दिष्टे समोर ठेवून केलेला अभ्यास सदर निंबधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

सन १९५२ ते २००० या काळातील मराठवाड्याचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी,कामगार,दलित, अल्पसंख्यांक, महिला, विकासात्मक, साहित्यिक, आरोग्य आदि क्षेत्रातील तत्कालीन परीस्थितीची इंत्यभूत माहीती व मार्गदर्शन दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राने केलेले दिसून येते. सदरवृत्तपत्र मूंबई, नांदेड, हैद्राबाद, औरंगाबाद येथून कधी सप्ताहिक, अर्ध सप्ताहीक, मासिक असा प्रवास करत करत दैनिकात रूपातंरीत होवून छापले जात असे. या वृत्तपत्राने मराठवाड्यातिल तत्कालीन विकास व मागास भागाचा विकास आणि राजकारण उद्योगधंदे , स्थानिक व्यावसाय, रोजगार , राजकारण, समाजकारण, हैद्राबाद संस्थानातील गूलामगिरी विरुद्धचा आवाज जनमाणसात पोहचवला, हैद्राबादच्या दरबारी असलेल्या इत्तेहादूल मूसलमीन, ईत्तेहादची सशस्त्र सेना, रझाकार संघटणा यांच्या जातियवादि उन्माद यावर प्रकर्षाने प्रकाश टाकलेला दिसून येतो.[१]

तानलेली मणे कशावरही विश्वास ठेवतात आणि मग अफवांची प्रतिक्रिया सार्वत्रिक होवून स्फोट होण्याची शक्यताच जास्त असते.[२] एरवी थंड असलेले लोक संयूक्त महाराष्ट्रसारख्या प्रश्नी पेटून उठतात तसे कित्येक लोक हैद्राबाद मूक्ती लढ्यात पेटून उठलेले दिसून येतात.[३] यात मराठवाड्याच्या अस्मिता जागृकतेचा भाग होता.हैद्राबाद मूक्त करुन मराठवाडा भारतीय स्वातंत्र्यात समाविष्ठ करण्याचा निर्धार हा तेथिल जनमाणसात रूजवल्या गेला.तेथूनच खरया आर्थाने लोकजागृतिला सूरुवात झालेली आपल्या लक्षात येते.हैदराबादचा मूक्तीदाता म्हनून स्वामी रामानंद तिर्थ [४] यांचे नाव अग्रक्रमाने समोर येते.

कारण सन १९५६ नंतर राज्य पूनर्चना झाली तेव्हापासून आजतागायत अनेक राज्यकर्ते, मंत्री,आमदार, खासदार यांनी मराठवाडा विकसित करण्या बाबतचे ठोस कृतिकार्यक्रम अथवा धोरण न ठरवता जाहीरपणे सभा, सम्मेलने,आंदोलने आदिमाध्यमातून महाराष्ट्र निर्मितीपासून विकासाच्या नूसत्या आनाभाका घेवून केवळ गप्पा मारतांना दिसतात. त्यामूळे मराठवाडा ,विदर्भ आणि कोकण या भागातील सर्वांगीण विकासाचा मूद्दा वेळोवेळी प्रलंबीत असल्याचे जाणवते महाराष्ट्रातील मागास भागाबाबत .इतर क्षेत्रात नेहरूंच्या काळात जे घडले तेच येथे घडतांना दिसत आहे.[५] ज्या भागाची प्रगति झाली त्याच भागात विकास झपाट्याने वाढत आहे.आणि जे भाग पूर्वीपासून मागास आहे त्यांचे मागसलेपण आजून मागास होतांना दिसत आहे.शासनाने औद्योगिक धोरण जाहीर केलेले असतांना फक्त विकसित शहरापूरते आणि भांडवलदार ,कारखानदार यांच्यासाठी जास्त सोयीसूविधा देत असल्याचे निर्देशित होतांना दिसते.त्यामूळे विकासाचे केंद्रीरण विकसित शहराजवळच होत आहे.

मूंबई, पूणे या भागातच उद्योगव्यवसायाचे केंद्रीकरण होत असल्यामुळे राज्यात औद्योगिक समतोल बिघडत आहे.केवळ भांडवली आणि उद्योगपती यांच्याभोवतिच सरकारचे औद्योगिक धोरण घूटमळत आहे.तेथे सामान्यव्यक्तीचा , समाजाचा अथवा नोकरदारांचा विचार होतांना दिसत नाही.परीणामी तरुणांना रोजगार उपलब्ध होत नसल्यामूळे बेरोजगारी,सामान्य व्यावसायिक यांच्या उत्पादित मालाला हमीभाव न मिळने, बाजारपेठ न मिळणे,छोटे व्यापारी यांना आपला माल स्थानिक भावातच विकणे यामूळे विकासाला चालना मिळत नाही अथवा त्यांचे विकेंद्रीकरण होत नाही असे दिसून येते.

ग्रामीण भागातिल उद्योग व्यवसाय वाढणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागात,लघू मोठी उद्योग,सडका ,रेल्वे, वीज, आरोग्य, सिंचन, शेती याबाबातच्या किमान मूलभूत सूखसोयी मिळायला हव्यात परंतु तसे होतांना दिसत नाही.हैद्राबाद मूक्तीसंग्रमातिल अनेक प्रसंग व अनेक पैलू विलक्षण चैतन्यदायी आहेत.

याबाबत इतिसाच्या अभ्यासकांना अजूनही आव्हान करताहेत,त्याचा अजून इतिहासकारांनी संशोधन करायला हवे. हैद्राबाद मूक्तीसंग्रमामधे अनेक ठिकाणी काही खेड्यांचे टापू सशस्त्र क्रांतीकारकांनी मूक्त केलेले होते व स्वराज्य स्थापन केलेले होते.[६] हैद्राबाद मूक्तीसंग्रमात ग्रामीण भागातील अशिक्षित महीलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.[७] त्यासाठी काय दिव्य करावे लागले ? जणतेचा पाठींबा कशा रितीने मिळवावा लागला? क्रांतीकारकांना जनतेने सहकार्य कोणत्या हेतूने व पद्धतिने मिळाले होते याचा अभ्यास होणे आजच्या परीस्थितीत महत्त्वाचे वाटते.

**निष्कर्षः**

१) समाजातील समाज समूहाच्या आंतरक्रीया,आंतर संबध ,परस्पर संबध समाजातील प्रथा,परंपरा यातून संस्कृतीकरणाला सूरुवात होत असते.

२) आपला देश,राष्ट्र,भाषा,संस्कृती,भूमीपूत्र आदि संकल्पना व्यक्तीच्या व्यक्तीमत्वावर प्रभाव पाडत असतात. स्वातंत्र्य प्राप्तनंतर सामाजिक सूधारणांची प्रक्रीयां मंद झालेली दिसून येते.

३) सत्तास्पर्धेच्या राजकारणाने जातियतेसारख्या समाजविघातक गोष्टींना अधिक प्रोत्साहन दिलेले आहेत.

४) निजाम सरकारच्या सातशै वर्षाच्या कार्यकाळात अडकलेल्या मराठवाड्याचा आजपर्यंत हवा तसा सांस्कृतिक , सामाजिक ,आर्थिक,सिंचनबाबत,सहकाराला अपेक्षित विकास होवू शकला नाही.

५) हैद्राबाद संस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी शिक्षण प्रसाराचे कार्य व प्रयत्न अत्यअल्प होते.महाराष्ट्रात मराठवाडा सामिल झाल्यानंतर शिक्षण झपाट्याने वाढत गेल्याचे दिसून येते.

६) शासनाचे सद्यः औद्योगिक धोरण जाहीर केलेले असतांना फक्त विकसित शहरापूरते आणि भांडवलदार ,कारखानदार यांच्यासाठी जास्त सोयीसूविधा देत असल्याचे निर्देशित होतांना दिसते.त्यामूळे विकासाचे केंद्रीरण विकसित शहराजवळच होत आहे. मूंबई, पूणे, नागपूर, नाशिक, आदि भागातच उद्योग व्यवसायाचे केंद्रीकरण होत असल्यामुळे राज्यात औद्योगिक समतोल बिघडत आहे.केवळ भांडवली आणि उद्योगपती यांच्याभोवतिच सरकारचे औद्योगिक धोरण घूटमळत आहे.

७)ग्रामीण भागातिल उद्योग व्यवासाय वाढणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागात,लघू मोठी उद्योग ,सडका, रेल्वे, वीज, आरोग्य, सिंचन,शेती याबाबातच्या किमान मूलभूत सूखसोयी मिळायला हव्यात परंतु तसे होतांना दिसत नाही.हैद्राबाद मूक्तीसंग्रमातिल अनेक प्रसंग व अनेक पैलू विलक्षण चैतन्यदायी आहेत.यामूळे इतिहास अभ्यासकांना संशोधनाच्या अनेक पैलुंवर अभ्यासास वाव आहे.

८) हैद्राबाद मूक्तीसंग्रमात स्वामी रामानंद तिर्थ यांनी भरीव कार्य केलेले आहे हे ज्ञात होते.

**संदर्भः**

१.भालेराव ,निशिकांत., समग्र अनंत भालेराव,खंड पहिला,२०११,नांदेड,पृष्ठ २५४.

२.पृष्ठ.उपरोक्त २२६.

३.उपरोक्त ,पृष्ठ.२२८

४.उपरोक्त ,पृष्ठ,२५४

५.महाजन,छाया,महाराष्ट्र राज्य सूवर्ण महोत्सव सिंहावलोकन,परिषद पूस्तिका,२०१०,देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद .

६.देशपांडे,भगवानराव,समाजक्रांतीचेचिंतन,लोकवाड्मयगृ-ह,मुंबई,२००९.पान.नं.२१३

७.उपरोक्त पृष्ठ. २१३.